सत्यशोधक -
-कां-
रिव्रस्त सेवक

जोतीबुवा फुल्यांचे अंतरंग

लेखकः— ग. म. नलावडे.

क्रिंमत दीड आणा.

[दुसरी आवृत्ती ४।९।२५]

प्रस्तावना

तीन पिढ्यामागें आपल्याच घराण्यांत होऊन गेलेल्या. पुरुषाचीच नव्हे, तर खुद्द सख्या चुलत आजोबाच्या आयुष्य कथेची प्रस्तावना लिहिण्याचा कठिण प्रसंग आला आहे. कहो तो मा मर जाय. ना कहो तो बाप कुत्ता खाय ! या गोष्टीप्रमाणें बोलावें तर आपल्याच घराण्यांतील पुरुषाची नालस्ती करावी लागते, बोलूं नये तर राष्ट्राचा अधःपात होतो. अशा स्थितींत सदसद्विवेक बुद्धी मात्र असें सांगते कीं, म्हातारी मरू दे बेहेतर आहे ! काळाला मात्र सवकवुं देऊं नकोस.

पसतीस वर्षांपूर्वी मातीस मिळालेले आमचे आजोबा त्यां या चरित्राला प्रस्तावना लिहिल्याबद्दल रुष्ट होतील असें निदान मला तरी वाटत नाहीं, कारण प्रत्यक्ष कृतीनें व आवडीनें केलेल्या कार्याचे जर कोणी तिऱ्हाइत मनुष्य अगर आपला कोणी नातलग वर्णन करून सांगूं लागला तर कार्यकर्त्या माणसाप आनंदच होईल.

बिचारे जोतिबाबा

जिवंत असतांना त्यांच्या धर्मद्रोही व देशद्रोही वर्तनामुळें त्यांच्याच घराण्यांतील मंडळी म्हणजे सख्खे चुलत भाऊ त्यांचा तिरस्कार करीत असत. इतकेंच नव्हे तर एकमेकांचा हात एकमेकाचें घरीं धुतला गेला नाहीं. जिवंत असतांना बिचाऱ्याची ही स्थिती व

मरणोत्तर

देखिल सख्खे चुलत पुतणे व आप्त मंडळीं जिवंत असून देखिल हिंदुधर्मशास्त्ररुद्धप्रमाणें मुलापेक्षां पुतण्याच्या हातच्या पाण्यांत

अधिक पुण्य आहे, असे असतांना ज्या महात्म्याची उत्तरक्रिया करण्यास देखिल त्यांच्या घराणांतल्या सख्या चुलत पुतण्यांनीं तयार होऊं नये व त्यांची उत्तर क्रिया त्यांनीं बाळगलेल्या एका मानस पुत्राकडून होण्याचा प्रसंग यावा यापेक्षां आमच्या आजोबांचा महात्मेपणा तो काय वर्णन करावा?

आमच्या आजोबाच्या जीवन चरित्रांतील मुख्य गोष्ट म्हणजे

सत्यशोधकसमाज

स्थापना ही होय! ह्या समाज संस्थपकाची ओळख पुढील चरित्रावरून आपणांस होईलच! परंतु वाचकांस एवढें सांगितल्याशिवाय रहावत नाहीं कीं, सत्यशोधक समाज म्हणजे एक नवीन धर्मपंथ स्थापन झाला असें उपलब्ध असलेल्या जोतिबाबाच्या ग्रंथावरून सिद्ध होत आहे. व ह्या नवीन स्थापित झालेल्या धर्माचा

गुलामगिरी

हा आद्य ग्रंथ होय. लेखकाचें नांवाचा उल्लेख न करतां जर ग्रंथ वाचला तर तो कोणी तरी परधर्मीय मिशनऱ्यानें लिहिला असावा असें वाटतें. यावरून जोतिबाबाचें चरित्रांतील व त्यांनीं स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजांतील गूढ वाचकांनीं ओळखावें.

थोडा मासला

म्हणून जातांजातां वरील त्यांच्या आद्य ग्रंथाची थोडी ओळख करून देतों.

वेद, भगवंतांनीं घेतलेले मच्छ, कच्छ, वराह, नारसिंह वगैरे अवतार, आदिनारायण शेषशायी भगवानापासून तो कोंपऱ्यावरील

म्हसोबापर्यंत जेवढ्या म्हणून मूर्ति हिंदू धर्मांत मानतात, तेवढ्या मूर्तींची अतिशय अश्लील भाषेंत निंदा करणें व श्रीज्ञानेश्वर महाराजादि संतमंडळी व मुकुंद रामदास स्वामी यांना तर आगादि (नपूंसक) म्हणणें, व त्यांनीं लिहिलेले ज्ञानेश्वरी आदि ग्रंथ पायलीचे पंधरा व आधोलीचे सोळा म्हणणें. व ख्रिश्चन धर्माच्या उदारतेचा व समानतेचा उदो उदो करणें ह्या सारखा दुसरा

नीचपणा

तो कोणता? असा स्वधर्म व स्वकुल बाटगा पुरुष आमच्या वंशांत होऊन गेला, हें सांगणें देखिल मोठें लाजिरवाणें आहे. असो. त्याला नाइलाज आहे. श्री संत शिरोमणी तुकाराम महाराज ज्या मोऱ्यांच्या घराण्यांत जन्मास आले त्याच मोऱ्यांच्या घराण्यांत चंद्रराव मोऱ्यासारखा श्रीछत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य संस्थापनेच्या मार्गांत कांटे पेरणारा व त्यांचा खून करण्यासाठीं धडपडणारा नीच मनुष्य कां जन्मास यावा? असो. विधिघटना ही अशी असते.

जोतीरावाचे स्मारक पुतळ्याच्या रूपानें करण्यास हपापलेल्या सत्यशोधकी मराठ्यांनीं भांबुर्ड्यास होणाऱ्या शिवस्मारकाच्य व्यवस्थेंत मराठ्याव्यतिरिक्त इतर कोणत्याहि जातीच्या मनुष्यास घेतले जाऊं नये म्हणून जीवाचे रान केलें, ते सत्यशोधक मराठे अब्राह्मणांत मराठे व मराठेतर असा भेद उठवूं पहात आहेत. पण एखादी हुलड उत्पन्न करण्यासाठा ब्राह्मणेतर या नांवाचा फायदा घेऊन लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकतात व स्वतःचा स्वार्थ साधतात, जोतीबावाचे स्मारक

परंतु त्यावेळीं कांहींच समर्थन न मिळाल्यामुळें तो उद्योग मागें पडला. कांहीं सत्यसमाजी लोकांशीं माझाहि परिचय असलेने त्यांचे-मध्यें माझी पुष्कळ वेळां बैठक असते. परंतु येथें खुद्द जोतीबाच्या आयुष्यासंबंधीं बोलण्याचा कधीं प्रसंग येत नसे व आलाच तरी त्या संबंधीं कोणासच कांहीं माहिती नसे.

पुतळ्यासंबंधींची ही वावटळ उठल्यानंतर मात्र माझी पूर्वीची जिज्ञासा पुन्हा जागी झाली. लो टिळक चिपळूणकर या ब्राम्हण लोकांचे पुतळे उभे केले जातात तेव्हां आपणहि कांहीं तरी करूं या भावनेनेंच सत्यसमाजिष्टांनीं ही उचल खाल्ली असावी हें मी ओळखून होतोच तथापि या मानीव मोठ्या माणसची खरी माहिती मात्र काढ-ण्याच्या उद्योगास लागलो. या वेळीं त्यांचे एक चरित्र प्रसिद्ध होणार म्हणून जाहिराती लागल्या, परंतु त्याच्या नांवावरून त्यांत कांहीं सत्यशोधकी विचित्रलीला सांपडतील असें वाटले व त्याप्रमाणें त्या पुस्तकांत शब्दांच्या नरककुंडाशिवाय मला तरी कांहीं आढळलें नाहीं. या छोट्या पुस्तकांत एकहि अपशब्द लिहावयाचा नाहीं असा माझा निश्चय आहे. तथापि उपरिनिर्दिष्ट पुस्तकाचें स्मरण झाल्यामुळें येवढें लिहिल्यावांचून राहवत नाहीं कीं,

‘ माणसाच्या मादीच्या पोटीं व्यालेल्या अवलादीच्या हातून’

असले पुस्तक लिहवले जाणें शक्य नाहीं. जोतीबाचें चरित्र लिहिण्यासाठीं साधु सत्पुरुषाची, आया बहिणींची, वेदपुरुषांची देशभक्तांची, तमासगिरांना लाजवणाऱ्या शब्दांनीं निंदा करावी लागते त्या चरित्राची व त्याच्या अनुयायांची काय महिमा वर्णावी ? एक गोष्ट खरी कीं, अज्ञानामुळें जोतीबा या नांवाबद्दल जो अनादर नव्हता, व सत्यसमाजिष्टांच्या चांगुलपणाबद्दल नसली

नं. १८२२

तरी त्यांच्या कमालीच्या हलकट मनाची जी खात्री नव्हती ती

एका देशाच्या दुष्मानानें नुकत्याच

प्रसिद्ध केलेल्या पुस्तकामुळें झाली. त्यानंतर मात्र जोतिबासंबंधीं माहिती मिळवण्यासाठीं मी खूप खटपट करण्यास सुरवात केली.

थोर पुरुषांचें चरित्र कळण्यास कठिण नसते. त्यांच्या कर्तब-गारीनें व थोरपणानें सामान्य जनसमुदाय वेडा होऊन त्यांची स्मृति न कळत चिरंजीव करीत असतो. थोर पुरुषांच्या गोष्टी, आख्यायिका शतकानुशतकें घरोघरीं तोंडोतोंडी सांगितल्या व ऐकल्या जात असतात. अगदीं सामान्यपणें प्रसिद्ध असलेल्या मनुष्याची गोष्ट घेतली तरी त्याच्या घराण्यांत तरी त्यांचे गुणगाण एखादी पिढी-पर्यंत सहज चालते. दुसरा मार्ग त्या थोर. पुरुषाची ग्रंथसंपत्ति, तिसरा मार्ग तत्कालिन वृत्तपत्रें व चौथा मार्ग प्रत्यक्ष त्या दिवंगत मनुष्याच्या सहवासांत दिवस काढलेले कोणी हयात असल्यास त्यांचेकडून माहिती मिळविणें. साधारणपणें इतक्या प्रकारांनीं कोण-त्याहि माणसाचे चरित्रासंबंधीं माहिती मिळवितां येईल. त्याचप्रमाणें मी गेले दोन महिने या कामासाठीं खर्ची घातले व या जोति-जिवित सागराचे तळाशीं मणी, कांचा, कांटे वगैरे जें कांहीं सांपडलें ते पुढील पानांत वाचकांच्यासाठीं मांडून ठेवले आहे. सार्वजनिक देश हिताच्या प्रश्नाचे वेळीं प्रत्येकानें जात्याभिमान पक्षाभिमान, या गोष्टी सोडल्या पाहिजेत. याच बुद्धीनें जोतीबांनें खरोखर कोट्यावधी अडाणी शेतकऱ्यांचे उद्धारासाठीं कांहीं काम केलें असेल तर त्यांचें स्मारक होणें जरूर असें वाटूनच त्यांचें चरित्राची माहिती मिळवण्याची मी खटपट केली, परंतु दुर्दैवाची गोष्ट कीं, मी शोधीत असलेल्या या जोतिजीवित सागराचे तळाशीं

करण्याच्या प्रकरणांतहि या सत्यशोधकी मराठ्यांचा असाच कांहीं-तरी अपमतलबी कावा दिसतो. तो ओळखून सर्वांनीं यांच्याशीं वागावें अशी विनंति आहे.

आपला,

चरित्र नायकाचा नातू,

विश्वनाथ महादेव फुले

प्रकाशक—ग. म. नलावडे, ३६७, नारायण पेठ, पुणें.

मुद्रक—गंगाधर विश्वनाथ गोखले,

शनिवार पेठ, ५३९ नारायण छापखाना, पुणें.

स्थापना
सं. १८३३
ग्रंथालय शाखा

विषय प्रवेश

कै. जोतिबा फुले यांच्या पुतळ्याचा आज बरेंच दिवस गाजा-वाजा चाललेला आहे. आपला पुतळा उभा केला जावा इतकी पुण्याई नकळत मिळवून दिवंगत झालेला, व आजमितीपर्यंत आपलें नांव विनयबुद्धीनें झांकून ठेवणारा हा थोर पुरुष कोण होता याकडे सर्वांचे लक्ष लागले. जातिविषयक किंवा पक्षविषयक अभिमान बाजूस ठेवल्यास, थोर पुरुषांची योग्य स्मारकें व्हावींत असेंच कोणाहि सुज्ञ मनुष्यास वाटेल. याच बुद्धीनें खरोखर जोतीबा फुले हे गृहस्थ थोर असतील तर त्यांचे स्मारक होणे बिलकूल गैर नाहीं असें मानणाऱ्यापैकीं मी एक होतो, तथापि जोतीबा फुले यांची खरी योग्यता काय आहे; त्यांनीं कोणते चिरंजीव कार्य करून ठेवले, ते किती विद्वान होते या गोष्टींपैकीं एकहि मला माहीत नव्हती व ती माहिती करून घेण्याची कधीं जरूरहि वाटली नव्हती. नाहीं म्हणण्यास कांहीं दिवसापूर्वीं सहज एका खिस्ति मिशनऱ्याशीं माझें बोलणें चाललें असतां त्यानें जोतीबांची फार स्तुति केली. त्याची समजूत मी सत्यशोधक आहे अशीच होती. व शेवटीं तो म्हणाला कीं,

> **" जातीनें तुम्हा लोकांचे हितापेक्षां येशूच्या कार्याला फार मदत केली आहे. तो फार मोठा होता. "**

या त्याच्या म्हणण्याचा मला विशेष अर्थ कळला नाहीं. तथापि जोतीबासंबंधीं माहिती मिळवावी अशी मात्र इच्छा झाली.

गोळा केलेला गाळ

वर प्रकाशांत आणीपर्यंतच माझें अंग इतकें ओरबडलें गेलें व त्याच्या घाणीनें माझें मस्तक इतकें बिघडून गेलें कीं, तो गाळ उजेडांत आणण्यापूर्वीच हातांतून टाकून द्यावा असें मला वाटलें. परंतु केवळ देशहिताकडे लक्ष ठेवून पारख करण्यासाठीं तो सूज्ञांचे पुढें मांडण्याचें मी धाडस करित आहे, चरित्रमंथनांतून सदर गाळ हातीं आल्यानंतर एक मी वाक्य उच्चारलें व तें म्हणजे 'सत्यशोधक फसले' हें होय. त्यानीं जो म्होरक्या पत्करला तो अगदींच हीन दर्जाचा आहे. पुतळा करण्यासाठीं म्हणून नांव पुढें करावयाचें तो वाणीनें विद्येनें, कृतीनें बद्धीनें कशानें तरी उज्वल असावयास पाहिजे होता. परंतु येथें सर्वच गटार गंगेची घाण ! सत्यसमाजिष्टांना पुतळ्यासाठींच माणूस शोधावयाचा होता तर मग फुल्याहून

गोब्राह्मण प्रतिपालक श्री छत्रपती शिवाजी महाराज

यांना पसंत करावयाचे होते. परंतु नाचे पोऱ्यांना स्वराज्य संस्थापक शिवबासारखा क्षत्रिय वीर कसा मानवेल? पुतळा कोणाचा करावयाचा ज्या पुरुषानें स्वतःच्या कर्तबगारीनें इतिहासाच्या निर्जीव पानांना सजीव करून त्यांत रंग भरला, अशा कीर्तिरूपानें उरलेल्या माणसाची जिवंत स्मृती पाहण्यास मिळावी म्हणून तशा माणसाचे पुतळे उभे करीत असतात परंतु ज्याचें नांव इतिहासांत तर नाहींच पण अवघ्या दोन तपांत, त्याच्या गांवांतून नव्हे प्रत्यक्ष राहत्या घरांतून विस्मृतीनें पुसून टाकलें त्या माणसाचा पुतळा उभारण्याची सूचना करणाऱ्यांच्या अकलेची तारीफ करावी तितकी थोडीच आहे.

जोतिबांच्या वेळची त्यांच्या घराण्यांतील कांहीं माणसें आज हयात आहेत. पण त्यांना या कुलदीपकाची कांहीं माहिती नाहीं, माहिती असण्याजोगें त्यानें कांहीं केलेच नाहीं, व जे केले ते सांगण्याची आम्हांस लाज वाटते असें ते म्हणत आहेत. अशा पुरुषाचा पुतळा उभारला जाण्याची इच्छा व्हावी ना? धन्य आहे काळाची ! मृताची निंदा करणें पाप आहे, हें नामर्दपणाचे लक्षण आहे. परंतु जे मी लिहित आहे ते अगदीं प्रामाणिक देशहितबुद्धीनें लिहित असल्यामुळें मला कांहीं पाप लागण्याची भीति नाहीं.

पुतळ्याचा फाल्गुनमास

सुरू झाला नसता तर फुल्यांच्या नामोच्चाराची कोणी तसदीच घेतली नसती, परंतु आतां सत्यशोधण्याचा खरा प्रसंग आला आहे. जोतीराव अप्रसिद्ध असते किंवा त्यांनीं कांहींच केलें नसते तरी देखील केवळ कांहीं न करण्यानें ते जर लोकप्रिय झाले तरी देखील त्यांचा पुतळा उभारण्यास कांहीं हरकत नव्हती. परंतु जोती जीवित सागर मंथनांतून जो

चिखल बाहेर निघाला

आहे तो चिवडून पाहिल्यानंतर देखील त्यांचा पुतळा उभारण्यास संमति देणें प्रामाणिक मनुष्यास शक्य नाहीं. मी ऐकून व वाचून, जमवलेल्या माहितीवरून असें अगदीं स्पष्टपणें सिद्ध होत आहे कीं, जोतिबा हे हिंदु धर्माचें रक्त शोषण करणाऱ्या

खिरस्ती मिशनऱ्याचे एक हस्तक,

होते. मिशनऱ्यांचे तर्फे हिंदू धर्माचे लचके तोडणारे नक, हिंदु धर्माचें प्रछन्न शत्रु; हेच त्या माहितीचें सार आहे.

जोतीबांनीं प्रत्यक्ष धर्मांतर केलें होतें किंवा नाहीं याचा पुरावा अद्याप मिळाला नाहीं. तथापि तो लवकरच मिळेल, पण ते ख्रिस्त्यांनीं

हिंदू धर्माविरुद्ध सोडलेले

एक पगारी प्रचारक होते ही गोष्ट त्यांच्या अस्तित्वाइतकी सत्य आहे. तेव्हां अशा स्वधर्मशत्रूचे स्मारक म्युनिसिपालिटीनें उभें करणें म्हणजे हिंदुधर्माच्या मुडद्यावर येशू ख्रिस्ताचा सांगाडा उभा करणें होय. हें धर्मद्रोहाचें पातक पुणें म्युनिसिपालिटीचे स्वाभिमानी सभासद खरी माहिती मिळाल्यानंतर करणार नाहींत असा मला भरवसा आहे. मिळविलेली माहिती साधार आहे. फक्त जोतीबांच्या धर्मांतरांची नोंद अद्याप सांपडली नाहीं. ता मिशनऱ्यांचें हातून या वेळीं मिळणें कठीण झालें आहे. जोतीबांनीं धर्मांतर देखील केलें होतें असें पाद्रीसाहेबांनीं तोंडीं बोलून दाखवलें परंतु पुरावा मात्र अद्याप मिळवतां आला नाहीं. सत्यशोधक समाजाच्या पुण्याईनें व

येशूच्या आशीर्वादानें

तो मिळवून लवकरच उजेडांत आणीन असा भरंवसा आहे. हा पुरावा जरी नसला तरी बाकीचा जो चित्रपट पुढील उपलब्ध पानावर उमटला आहे. तो सुद्धां त्यांचे दगडाचे प्रतिबिंब उठवण्याच्या विरुद्धच साक्ष देईल. जोतीबा हिंदुधर्माचे अंग होरपळून काढणारा

अस्तनीतील निखारा

होता. मिशनऱ्यांनीं हा निखारा प्रदीप्त केला, व त्यामुळें हिंदु धर्माचे अपरमित नुकसान झालें हें सिद्ध होत असतां त्यांचा पुतळा उभारला जाणें हा हिंदु धर्माचा अपमान आहे. हा धर्माचा

अपमान पुणें म्युनिसिपालिटीचे अक्कलवान सभासद करणार नाहींत असा मला पक्का विश्वास वाटतो. जोतीबांचा जिनाउ पुतळा आजच हवा असेल, त्यांनीं सत्यसमाजिस्टांना गांवोगांवीं मिळणाऱ्या तमाशाच्या पैशांतून

कोठेंहि समाजिष्टांच्या उकिरड्यावर

तें स्मारक करावें. हिंदुधर्मद्वेष्ट्यांचे स्मारक हिंदुच्या पैशांतून सार्वजनिक जागीं होणें शक्य नाहीं. आरशांत चेहरा पाहिल्यास निदान स्वतःच्या मनाला बरें वाटेल इतके तरी रूप गोड असावे लागते. परंतु दर्पणांत रूप बघतांच थोबाडावरील छप्पन्न डाग ज्याच्या पापाची गेलेली स्मृति जागृत करतात, त्या सडक्या शीलाच्या माणसानें आपला चेहेरा आरशांत डोकावयाचे साहस कधीं करूं नये. व ते केलेंच तर निदान त्याचे वर्णन शेजाऱ्यांस कधीं सांगू नये. कारण त्याला प्रत्यक्ष स्वतःच्या पापाची दुर्गंधी येतच असते. येवढाच प्रेमाचा उपदेश सत्यसमाजिष्टांना करून व इतर सूज्ञ वाचकांना पुढील पानांतील जोतीबांचे चरित्र वाचून पहाण्याची विनंति करून विषय प्रवेश पुरा करतो.

कै० जोतबा फुले यांचें चरित्र

चरित्र नायक जोतीबा फुले यांचे पूर्वजांचे मूळ गांव सातारा जिल्ह्यांतील कटगुण हे होय. यांचे उपनांव गोऱ्हे असे होते. कटगूण येथें चरित्र नायकाचे पुर्वज चौगुले होते. तेथें असतानांच जोतीबांच्या पणज्याचे व गांव कामगार कुलकर्ण्याचे भांडण होऊन त्यानें

कुलकर्ण्याचा खून केला, अशी उपलब्ध असलेल्या सर्व चरित्रांत गोष्ट आहे. परंतु सर्वच चरित्रें एका ठिकाणाहून उगम पावलीं असल्या-मुळें फरक असणें शक्यच नाहीं. परंतु खून केला कां, तो पचवला कसा वगैरे कांहींच विश्वसनीय माहिती मिळत नाहीं. सदर पणजोबांनीं पुढें आपले गांव सोडून पुरंदर तालुक्यांत खानवडी येथें वस्ती केली, परंतु तेथें उदर निर्वाहाची विशेष सोय नसल्यामुळें जोतीबाचा आजा सटवाजी उर्फ शेटीबा यानें खानवडी सोडून पुण्याची वाट धरली. पुण्यास नव्या पेठेंत सटवाजीचे मामा झगडे हे राहात होतें. त्यांचेकडे येऊन ते राहिले. सटवाजीस येथें राणूजी, कृष्णा व गोविंदा असे तीन मुलगे झाले. मुलांच्या लहानपणींच सटवाजी वारल्यानंतर रा. झगडे यांनींच मुलांचे पोषण केलें. परंतु पुढें कृष्णा व गोविंदा दुर्वर्तनी निघाल्यामुळें झगड्यांनीं त्यांना वेगळे ठेवले, व राणूजीस मात्र घरांत ठेऊन घेतलें. राणोजी चांगुलपणानें राहिल्यामुळें पुढें झगड्यांची दौलत त्यांचेकडे आली. त्यांनीं राणोजीला व त्याच्या भावाना माळीपणाचा धंदा शिकवला होता. राणोजी त्यांत दर्दी होऊन फुलांचे पोशाख वगैरे उत्तम करूं लागला. कृष्णा आणि गोविंदाचे लक्ष मात्र धंद्यापेक्षां

उडाटप्पूपणा करण्याकडे

जास्त होतें. राणोजीचाज पोशाख पेशव्यांचेकडे जाऊं लागला. एकदां राणोजीचा फुलांचा पोशाख इतका उत्तम साधला होता कीं, श्रीमंत पेशवे फुलांचेच धोतर नेसून व इतर पोशाख घालून दरबारला गेले. व त्यांनीं खूष होऊन राणोजीला मागणी मागण्यास सांगि-तलें. राणोजीच्या मागणीप्रमाणें ४५ एकर जमीन येथील स्वार गेटा-पाशीं श्रीमंतांनीं देऊं केली. ती जमीन आजतागायत त्यांचे वंशजाकडे

आहे. व त्या वेळेपासून त्यांचें मूळचे गोऱ्हे उपनांव जाऊन हे फुले झाले; व त्यांचा गांवांतहि चांगला जम बसला. राणोजीच्या नांवाचा जरी बोलबाला झाला असला तरी कृष्णा व गोविंदा हे दोघे

अर्धांतरी तरंगत होते.

राणोजीला सुस्थिति प्राप्त होतांच त्यानें भावांना उद्योगाला लावून दिलें. शुक्रवार पेठेंत कृष्णाला फुलांचें दुकान काढून दिलें, व गोविंदा मुंढव्यास शेतीसाठीं जाऊन राहिला. पण तेथें त्याला तूट येऊन तो परत पुण्यास येऊन राहिला. एकंदरींत गोविंदरावांचें आयुष्य साधारण हलक्या प्रतींचेंच होतें. अशा स्थितींत गोविंदरावाचे पोटीं पुण्यास इ. स. १८२७ सालीं जोतीचा जन्म झाला. सटवाजी पासून वंश वृक्ष धरल्यास तो पुढीलप्रमाणें आहे.

- सटवाजी
  - राणोजी
    - बाबाजी
      - भाऊ
        - बाबुराव फुले (म्यु. कौं.)
      - महादेव
        - विश्वनाथ
        - सीताराम
  - कृष्णा
    - ....
  - गोविंदा
    - जोतिबा
      - ....

जोतीचा जन्म एकंदर हलाखीच्या स्थितींतच झाला व एक वर्षाच्या आंतच या पुण्यवान पुत्राची माता मोक्षाच्या

मार्गाला लागली. सहजरीत्या जोतीचा सर्व भार गोविंदरावावर पडला,
व नेहमींच्या अनुभवाप्रमाणें बापाच्या पांघरुणाखालीं जोती बाळपणीं
बराच उछृंखल झाला. खावें प्यावें व पोरांत उडाणटप्पूपणा करावा
येवढेंच जोतीस ठाऊक होतें. घरचे साधारण दारिद्र्य होतें. तथापि
जोती हा बापाचा लाडका मुलगा असल्यामुळें त्याला गोविंदराव
फार जपत असत. आपल्या मुलानें शिकून मोठें व्हावें अशी कांहीं
बापाची विशेष इच्छा नव्हती. तथापि ८ वें वर्षी जोतीला मराठी
शिकण्यासाठीं शाळेंत घातलें. ही शाळा बहुधा मिशनऱ्यांची
असावी गोविंरावांचें त्या वेळचें घर

पंचहौद मिशनजवळच

मीठगंज पेठेंत होतें. तेथें शाळेंत घातलें तरी जोतीचा अभ्यासाकडे
विशेष ओढा नव्हता. त्यानें शक्य तितका शाळा टाळण्याचा
प्रयत्न करावा, व बापानें शेजाऱ्या पाजाऱ्याच्या आग्रहानें त्याला
शाळेंत नेऊन बसवावें असा क्रम चालला होता. जोतीला शाळेंतून
काढण्यासाठीं गोविंदरावांच्या कोणी ब्राम्हण कारकुनानें फार
खटपट केली असें कांहीं लोकांनीं लिहिलें आहे. पण याला पुरावा
कांहींच नाहीं. दुनियेचें दारिद्र्य गोविंदरावाच्या पाठीस चिकटलें अस-
ल्यामुळें त्यांचे घरीं कारकून असणें शक्यच नव्हते. स्वतः गोविंदराव
बेकामी फिरत होते तर कारकून कोणत्या कामासाठीं त्यांनीं ठेवला
होता ? कांहीं झालें तरी जोतीचें शिक्षण पंधरा वर्षेपर्यंत विशेष
कांहींच झालें नाहीं. घरचे खावें, तालीमबाजी करावी, रस्त्यानें
चालतां चालतां पोरांसोरांना टपल्या मारीत हिंडावें एवढाच जोतीचा
उद्योग होता. तथापि त्यांची बुद्धि मात्र चांगली होती. जोतीला
इंग्रजी शिकवण्याची सूचना लिजटसाहेबानें केली असा उल्लेख

आहे. परंतु जोतीच्या मिशनऱ्यांच्या सहवासानंतरच हा योग
घडून आलेला आहे.

जोतीच्या जन्मापूर्वी नुकतेच पुण्यास

मिशनऱ्यांचे पाय

पसरूं लागले होतें. परंतु त्यांना येथें जुन्या ब्राह्मण वर्गकडून
बराच त्रास होत होता, याच सुमारास पुण्यांत मीठगंज पेठेंत कांहीं
मुलांची पळवापळवी झाली व हिंदूलोकांत फार अस्वस्थता माजली.
नवीन आलेलें काळ्या झग्याचे येशूपुत्रच मुलें पळवीत असावेत
अशी हिंदूंची समजूत होती. त्याप्रमाणें एके दिवशीं मीठगंज पेठें-
तील एक मूल हरवलें व त्यामुळें लोक बेदील झाले. तेव्हां जोती
मिशनऱ्यांकडे गेला व तेथें बराच वेळ खलबत केल्यावर जोतीनें त्या
पेठेंतील बेफाम झालेल्या लोकांना शांत करण्याचा प्रयत्न करून
त्यानें मिशनरी लोक अगदीं निर्दोषी आहेत असें बजावलें.
या वेळीं एक ब्राम्हणगृहस्थांनीं मिशनऱ्याकडे जाऊन चौकशी कर-
ण्याचा प्रयत्न केला, पण त्या चौकशींत मिशनरी लोकांनीं उडवा-
उडवीचीं उत्तरें दिलीं. त्यामुळें मिशनरीच दोषी असावेत अशी
खात्री वाटून त्या गृहस्थानें पेठेंतील लोकांस तसें सांगितलें. ही गोष्ट
जोतीबास कळतांच त्यानें मिशनऱ्याची बाजू घेऊन ब्राह्मणांस शिव्या
देण्यास सुरवात केली. पण पेठेंतील लोक फारच संतापले असल्या-
मुळें तें मूल २।३ दिवसांत परत सोडण्यांत आलें. पण जोतीबामुळें
आपल्यावरील प्राणांतिक संकट टळलें अशी मिशनऱ्यांची खात्री
होऊन ते जोतीबाला फार नांवाजूं लागले.

जोतीच्या पराक्रमामुळें मिशनरी थोडे ऋणि झालेच होते. म्हणून
त्यांनीं या तरुण अल्लड कोंकराला इंग्रजी शिकविण्याची व्यवस्था केली

या संधीचा फायदा घेऊन त्यानें बापाला मिशनऱ्याकडे नोकरीस लावून दिलें. ही नोकरी माळीपणाची होती. पण चर्चभोंवतीं बागेंत कामासाठीं गोविंदरावास लावलें कां फक्त झाडें, बीं वगैरे पुरविण्याचे काम त्याकडे होतें हें नक्की कळत नाहीं. मात्र

मुलामुळें बापास येशूच्या आवारांत

प्रवेश मिळाला व स्वतः जोतीबा बूट इष्टाकण्या चढवून चर्चीत विंग्रजी शिकण्यास जाऊं लागला.

जोतीचें शिक्षण २ वर्षांपेक्षां जास्त झालें नाहीं. तथापि त्याचा मिशनऱ्यांशीं इतका दृढ परिचय झाला कीं, तो पुढें आजन्म टिकला व साऱ्या आयुष्यभर जोतीच्या जीवनाची काळजी येशूच्या लाडक्या दूतानींच घेतली. जोतीच्या आयुष्यांत पुढें जी

ब्रह्मदेवाची अखंड रेषा उमटली

तिचा उगम येथेंच झाला. पाद्री लोकांना आरंभीं आरंभीं जर कोणाकडून त्रास व इजा पोचली असेल तर ती ब्राह्मणांकडून यामुळें ही ब्राह्मणाची जात पाद्र्यांच्या डोळ्यांत फार सलत होती. व तीच गोष्ट

खिस्ताळलेल्या जोतीनें

उचलली. यावेळीं जोतीची विशी उलटून मिशी फुटली होती. पाद्र्याच्या सहवासानें त्याला हिंदूधर्म, हिंदूसमाज, आपली रहाणी आपल्या बायका या सर्व गोष्टी त्याज्य वाटूं लागल्या होत्या. व त्याच दृष्टीनें आपण अगदीं साहेबासारखें असावें असें वाटूं लागलें होतें. यामुळें त्याच्या जातींत त्याला कोणी घेत नसे जोतीला त्याचे जातभाई हा खिस्ती झाला असेच समजत असत. या मोकाट वागणुकीमुळें जोतीला जातीच्या आसऱ्यास आंचवावें लागलें.

या वयांत पाद्र्याच्या सहवासानें जोती पूर्ण पाद्राळला व त्याच्या पुढील सर्व आयुष्याला शुद्ध मिशनरी थाटाचे वळण लागलें. जोतीची प्रत्येक कामगिरी शुद्ध मिशनऱ्यालाहि मागे टाकणारी होती हें त्याच्या कामगिरीचा अभ्यास करणाऱ्याला सहज कळण्याजोगे होते. वयाच्या २५ व्या वर्षी जोतीबाचे सार्वजनिक आयुष्यास सुरवात झाली. त्यांचे शिक्षण इंग्रजी २ वर्षे व मराठी ५।६ वर्षे झाले तेवढेंच. या खेरीज त्यांनें स्वतंत्र विद्याव्यासंग असा कांहीं केलेला नाहीं. पाद्र्याकडून त्यांना जे कांहीं ज्ञानामृत मिळे तेवढ्यावरच त्याच्या विद्वत्तेचे दुकान थाटले जात असे. प्रथम जोतीबानीं मुला-मुलींची शाळा काढली असें म्हणतात. पण ही शाळा जोतीबानीं काढली कीं, मिशनऱ्यांनीं काढून जोतीबाकडे तिचे चालकत्व दिले याचा निर्णय लागत नाहीं. जोतीबाकडे प्राथमिक पाठ देण्याचे काम होते. मुख्य शिक्षक इतरच होते. यावरून व इतर पुराव्यावरून मुलींची शाळा जोतीबानें काढली नसून ते मिशनऱ्यांच्या

मेंढपाळाचे काम

करीत येवढेंच सिद्ध होते. पुढें सुद्धां १८५२ मध्यें सरकारी रीतीनें जोतीचा जो जाहीर सन्मान केला त्यावेळीं देखील, जोतीबानीं स्त्री-शिक्षणाप्रीत्यर्थ स्वतंत्र प्रयत्न केले म्हणून नव्हे तर स्त्रीशिक्षणाच्या कामात जी मदत केली त्याबद्दल हा सन्मान आहे अशा अर्थाचीं भाषणें करण्यांत आलीं होतीं. उलट. शालजोडी जी दिली गेली ती मानाची नसून हिंदू धर्माविरुद्ध जोतीबानीं जीं पापें केलीं तीं झांकण्यासाठीं मिशनऱ्यांनीं हा प्रसंग घडवून आणला असाच त्या वेळीं सर्वत्र बोलवा होता. मुलींच्या शाळेप्रमाणें त्यांनीं १८४८ सालीं मराठे लोकांसाठीं बुधवारांत भिड्यांच्या वाड्यांत शाळा

काढली. हीच जोतीबांची पहिली शाळा असावी. यांत मुलींहि घेत असत.-परंतु

अस्पृश्यांना मात्र यांत मुभा नव्हती.

जोतीबांनीं आपल्या पत्नीला शुद्ध नव्या थाटाची बनवण्यासाठीं खूप खटपट केली.

आपल्या बायकोनें मिशनरी लोकांच्या कळपांतील इतर स्त्रियांप्रमाणें शिकावें व वागावें म्हणून जोतीबानीं त्या पतिव्रता स्त्रीची फार छळणूक केली. पण पतिव्रताधर्मास अनुसरून त्या साध्वीनें पतीच्या शब्दाला मान दिला व थोडेसें शिक्षण घेतलें. येवढ्यावरच जोतीबानें कसेंतरी समाधान मानून घेऊन आपल्या स्त्रीला तिच्या मर्जीविरुद्ध आपल्या बरोबर तो शाळेंत घेऊन जाऊं लागला. या मुळें व जोतीच्या अवांतर अधर्मी वर्तनामुळें बाप लेकांचें बरेंच मांडण झालें. असो.

जोतीबा ख्रिस्ती मिशनऱ्यांचे संगतीनें हिंदु धर्माची निंदा करी म्हणून लोक त्यांची टर करीत. व आपलीं माणसें जोतीतर्फे बाटवली जात आहेत अशा समजुतीनें सर्वजण त्यांना पाण्यांत पहात असत. पुढें जोतीबांची शाळा त्यांच्या वर्तणुकीमुळें लवकरच बंद झाली. नंतर अस्पृश्यासाठीं त्यांनीं एक शाळा काढली. वरीलप्रमाणें तिचीहि वाट लागली.

या नंतर जोतीबांचें महत्कार्य म्हणजे वाममार्गाला लागलेल्या विधवा स्त्रियासाठीं आश्रयस्थान उघडणें हें होय. जोतीबांच्या सर्व कार्याची मध्यरेषा पाहिली म्हणजे त्यांतील इंगित बरोबर कळून येते. येथून तेथून सर्व

[library stamp]

मिशनऱ्यांची नक्कल.

त्यांच्या क्रियेंत दिसते. तेहि आपल्या समाजाची सुधारणा
करावी या बुद्धीनें नव्हे तर आपल्या पोटापाण्याची काळजी
घेणाऱ्या येशूच्या दूतांना खूष ठेवण्यासाठीं होय. स्वतःच्या विचा-
रानें किंवा विद्वत्तेने आपलें ध्येय किंवा तत्त्वें ठरविण्याइतकी
मनाची प्रगल्भ स्थिति जोतीबांची झालीच नव्हती. म्हणूनच मिश-
नऱ्यांपुढें त्यांना खुष करतां येईल अशा गोष्टी कराव्यात व आपल्या
लोकांत आल्यानंतर त्यांच्याशीं गोड गोड गोष्टी कराव्यांत अशी
त्यांची दुटप्पी वृत्ती होती. अशी स्थिति असतांना देखील त्यांना
कांहीं बगलबच्चे मिळाले होते. आज सुद्धां साहेब म्हणतांच जो
आदर कित्येकांना वाटतो व त्या तशा साहेबांशीं आपली ओळख-
देख असावी म्हणून कित्येक झुरणीस लागतात तसे महाभाग त्या
वेळीं असल्यास आश्चर्य नाहीं. परंतु जोतीचें खरें अंतरंग कळतांच
त्यापैकीं कांहीं लोकांनीं त्याचा धि:कार केला असें म्हणतात.
जोतीचे सहाय्यक डॉ. विश्राम यानांहि पुढें पश्चात्ताप होऊन
त्यांनीं सत्यसमाज वगैरे गोष्टींचा खासगी रीतीनें मित्र-
मंडळींपाशीं निषेध केला असें समजतें. शाळांचा खटाटोप
आटोपल्यानंतर जोतीबांनीं विधवा-विपरीत आचरणावर पांघरूण
घालण्यासाठीं आश्रम उघडला. हा आश्रम त्यांनीं सदिच्छेनें काढला
असणें संभाव्य आहे. परंतु कोणत्याहि स्त्रियांची गोष्ट घेतली म्हणजे
तिच्या बरोबर दुराचार व दुष्ट गोष्टी चिकटतात. विधवाश्रमांत जी
पहिली बाई घेतली तिचा व आश्रमाच्या चालकाचा पूर्वीपासूनच
ठीक संबंध नव्हता असें म्हणतात. व ती बाई यांच्याकडे राहिल्या-
नंतर गर्भवती आहे असें आढळून आल्यावर पुढील प्रसंग टाळण्या-

साठीं जोतीबास आश्रम उघडणें भाग पडलें. सदर बाईच्या पोटींच यशवंत नांवाचा मुलगा झाला. व तो आपला मानसपुत्र म्हणून त्यांनीं जवळ बाळगला. या विधवाश्रमांत कांहीं बाया येऊन प्रसूत होऊन मूल ठेवून निघुन गेल्या. पण एका बाईची प्रसूती झाल्यानंतर तिचा मुलगा ख्रिस्त्यांना देण्यासाठीं जोतीबा मागूं लागले. परंतु त्या बाईनें तो देण्याचे नाकारले. त्यामुळें त्या बाईची व जोतीबाची बरीच वाईट शिवीगाळ होऊन विधवाश्रमाचा बोजवारा तेथेंच उडाला यप्रमाणें सर्व उद्योग आटोपल्यावर त्यांनीं पुन्हां पाद्र्याकडे उघड नोकरी धरली ती आमरणांत केली. या नोकरींत असतानाच १८७३ सालीं जोतीबुवांनीं आपल्या आयुष्यांतील जी महत्तम कामगिरी केली ती म्हणजे

ख्रिस्तिधर्मांतर्गत सत्यशोधक समाजाची स्थापना ही होय.

सत्यशोधक समाजाची स्थापना केल्यानंतर जोतीबांनीं आपला हा असुरी पंथ वाढविण्यासाठीं गावांत ठिकठिकाणीं प्रयत्न करून पाहिला. परंतु सहज धर्मप्रवृत्त असलेल्या लोकांना जोतीबाचें हे नवे खुळ पटेना. जोतीबा आपल्या बैठकींतल्या माणसांना जेव्हां आपल्या समाजाची द्वेषपरिपूरित तत्त्वें गोड भाषेंत रंगवून सांगू लागले तेव्हां त्यांच्याच इष्टमित्रांनीं संतापून जाऊन जोतीबांची प्रथम सौम्य शब्दांनीं कान उघाडणी केली. पण तेवढ्यानेंहि जोतीबा आपला हट्ट सोडत नाहीं असें पाहून कांहीं माथेफिरूनीं

जोतीबांची चांगलीच खेटरपुजा

बांधली. पुढें पुढें तर जोतीबांच्या घरांतल्या व घराण्यांतल्या मंडळींनीं त्यांच्यांशीं रोटी व्यवहाराचा संबंध सुद्धां तोडून टाकिला. यावरून सर्व जनसमाजांत जोतीबांना काय मान मिळत असेल याची कल्पना वाचकांनीं करावी. जोतीबांच्या अड्यांत त्यावेळीं जे लोक होते ते पुढें पुढें

आपणांस सत्यशोधक म्हणवून घेऊं लागले. याचे कारण जोतीबा मार्फत त्यांना मिशनरी लोकांकडून तनखा मिळत असे, असें त्यावेळचे लोक सांगतात. सारांश, सत्यशोधक समाज या नांवाखालीं जे लोक एकत्र जमत असत, ते सारे एकजात कुटाळ, धर्मद्रोही, दुराचारी होते, असे अनुमान काढल्यास तें वावगें होणार नाहीं. असो.

सत्यशोधक समाजाचे कार्य

सत्यशोधक समाजाची मुहूर्त मेढ रोवून त्या झेंड्याखालीं जेव्हा ५।१० अनुयायी गोळा झालेले जोतीबानीं पाहिलें तेव्हां त्यां लोकांना वळविण्यासाठीं जोतीबाचे नांवावर जे कांहीं ग्रंथ प्रसिद्ध झाले ते ग्रंथ वाचले असतां असें आढळून येईल कीं, सदर ग्रंथ हिंदुधर्मीय मनुष्याच्या लेखणींतून उतरले नसून लिहिणारा मनुष्य निव्वळ ख्रिस्तीच असला पाहिजे. जोतीबाचे नांवावर प्रसिद्ध झालेल्या या ग्रंथामुळें जोतीबा समाजांत फारच अप्रिय होऊं लागले, शिवाय जोतीबा मधून मधून गोरक्षण, मूर्तिपूजा धर्मग्रंथ या संबंधीं निंदात्मक हस्तपत्रकें वाटत असत, त्यामुळें लोक त्यावर फारच रुष्ट झाले. व एक वेळ तर अगदीं अत्याचारावर प्रसंग आला असतां केवळ तीं पुस्तकें पाद्री साहेबांची आहेत असें सांगून जोती निसटला. जोतीबानें एकंदर ८।१० लहान मोठीं पुस्तकें प्रसिद्ध केलीं. गुलामगिरी हें पुस्तक म्हणजे

सत्यशोधकांचा पवित्र ग्रंथ होय.

अशा प्रकारचे मुकुंद ज्ञानेश्वर रामदास वगैरे साधुसज्जनांच्या निंदेनें ओतप्रोत भरलेलें, एवढेंच नव्हे तर साक्षात् आदिनारायण शेषशाई भगवानाची व त्यांच्या अवांतर कार्याची अतिशय अश्लील व निंद्य भाषेंत टवाळी केलेलें पुस्तक जर श्रीशिवछत्रपतींच्या काळीं कोणी एकाद्या

जोतीबा सारख्या माणसानें प्रसिद्ध करण्याचें धाडस केलें असतें तर त्याची काय स्थिती झाली असती हें वाचकानींच उमजावे. संपली. समाजसंस्थापक गोब्राह्मणविध्वंसक जोतीरायाची इतकीच काय ती प्रचंड कामगिरी झालेली आहे. याप्रमाणें वर दिग्दर्शित केल्याप्रमाणें प्रचंड कार्य, जनन मरणाच्या खुणांनीं रोखलेल्या आयुष्याच्या मर्यादित कालांत करून १९ व्याशतकांतील हा

महाराष्ट्राचा महात्मा नव्हे खिस्तात्मा

मृत्यूच्या स्वाधीन झाला.

जोतीबुवांचे मरण

एके दिवशीं एक मराठा माळकरी--वेडा पीर बिचारा--वारीसाठीं आळंदीस चालला होता. मुखानें प्रेमळपणें हरिनामाचा गजर चाललेला आहे. “ जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ । अंगीं ऐसें बळ रेडा बोले ॥ असा अभंग तो म्हणत असतां त्याला विद्वद्वर्य जोतीबुवानें गांठलें व त्या अभंगाचा अर्थ विचारला. तो कांहीं इंग्रजी शिकलेला नव्हता, त्यानें कोठें चर्च बघितलें होतें ? पोटासाठीं तो खिस्ताळलेला नव्हता; त्याच्या पाद्रीसाहेबांच्या ओळखी झाल्या नव्हत्या किंवा त्याच्या पाठीवर शालजोड्याहि फेंकल्या नव्हत्या. यामुळें साहजिकच तो अडाणी मनुष्य ज्ञानदेव, तुकाराम, रामदास, वगैरे संतांच्या वचनाचे स्मरण करीत होता. परंतु पाद्राळलेल्या जोतीबाला ते बरें न वाटून त्यानें त्या वारकऱ्यास तो सोन्याचा पिंपळ किंवा

बोलका रेडा दाखव नाहींतर दरवर्षी नवरा मरून लग्न लावणाऱ्या तुळशीच्या हाडकाची तुझ्या गळ्यांतील माळ तोडून टाकतो. असे म्हटलें. तेव्हां त्यानें जोतीबास आळंदीस बोलावले. माळकरी पुढें गेला व जोतीबा दुपारीं भोजनोत्तर आळंदीस गेले. त्यांना तो वारकरी लौकर भेटला नाहीं. परंतु यांना मात्र तेथें पोहोचतांच हगवणीनें पछाडलें. पुढें तो वारकरी आला व सोन्याचा पिंपळ पहाण्यास मजबरोबर चला असें म्हणूं लागला पण जोतीबास तांब्या व शौचकूप सोडणें शक्यच नव्हते. मला पिंपळ पहाण्यास सवड नाहीं. कसें तरी पुण्यास पोंचवा म्हणून त्यानीं त्या वारकऱ्याची विनवणी केली. व ते परत पुण्यास आले. सोन्याचा पिंपळ पाहण्यास गेलेला हा पुण्यप्रभावी पुरुष आळंदीहून जो आला तो या पिंपळ पाहाण्याच्या विकारानें कायमचा पछाडला गेला. जोतीरावाला या हगवणीच्या विकारांतच पक्षघात होऊन राम म्हणावें लागले. व अशा दुःखद स्थितींत १८९० सालीं सत्यसमाज संस्थापक, मिशनऱ्यांचा हस्तक, गोब्राम्हणविध्वंसक असा हा

काळ्या अस्मानचा अंधेर तारा

तुटून पडला व कुठल्याश्या गटार गंगेंत जाऊन विलीन झाला. त्या दिवशीं जगांतली मोठी घाण निघून गेली म्हणून पर्जन्य राजानें दुःखाश्रु ढाळून भूतल धुवुन काढलें. जिकडे तिकडे एकच दुःखकारक वार्ता; स्त्रियापुरुष धाय मोकलून सांगत होते कीं, आज धरणी हलकी झाली आहे. हिंदुधर्माच्या अस्तनींतील निखारा आज विझला आहे !!!

जोतीबाच्या मृत्यूमुळें त्यांचे स्नेही सोबती कष्टी झाले. त्यांचे घराणें होते परंतु ते जोतीला खिस्ती समजत होते. त्यामुळें

दा. नं. २८८६

त्यांच्यांपैकीं अंत्यविधीस कोणीच हजर नव्हते. मित्रांपैकीं ५।२५ मंडळीं हजर होती, पण अग्नि देण्यास कोणी पुढें होईना. तेव्हां जोतीबुवानीं जो एक बिन बापाचा चिरंजीव पाळला होता त्या यशवंतरावानीं भडाग्नि दिला. जोतीबुवांच्या मागें त्यांच्या समाजाची चळवळ कशी चालली आहे हें यापुढें प्रसिद्ध होईलच. आजच्या तमासगीर सत्यशोधकावरून जोतीबुवाची पारख करूं नका असें कित्येक म्हणतात. परंतु तसा फरक करण्याचे कारण नाहीं. इतकेंच नव्हे तर गुरूला शोभण्यांसारखीच शिष्यांची अवलाद तयार होत आहे येवढें सत्यज्ञान वाचकांना झाले तरी लेखकाला त्यांत समाधान आहे.